**<u>प्रतिवादी यांचे साक्षीदार क्र. १५ यांचे ज्यादा सरतपासणीवर उलटतपासणी प्रतिवादी क्र. ९ चे वारसांतर्फे तर्फे वकील श्री. पाटील यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>**

प्रतिवादी क्र. ९ चे वारसांना व त्यांचे विधिज्ञांना वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब त्यांचे वतीने प्रतिवादी क्र. १५ चे अधिक सरतपासावर कोणताही उलटतपास नाही.

**<u>प्रतिवादी यांचे साक्षीदार क्र. १५ यांचे ज्यादा सरतपासणीवर उलटतपासणी वादी तर्फे वकील श्री. डी.आर.देसाई यांचे तर्फे शपथेवर सुरु –</u>**

हे म्हणणे खरे आहे की, वादी यांनी प्रथमतः मुळ दावा सन १९९९ साली सोलापूर येथे दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामध्ये सुरुवातीपासुन आजतागायत चार ते पाच वेळा दुरुस्ती झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दुरुस्ती या माननीय न्यायालयाच्या आदेशानुसार झाल्या. मी दि. २–०२–२००८ नंतर दि. १३–१२–२०११ ही दाव्यातील कलम नंबर २३/ब सहाव्या ओळीमध्ये झालेल्या दुरुस्ती बाबत वरीष्ठ न्यायालयात दाद मागितलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, ती दुरुस्ती मला मान्य असलेमुळे मी वरिष्ठ न्यायालयात तीस आव्हानीत केली नाही.

हे म्हणणे खरे आहे की, तारण म्हणुन राजेंद्र जगताप यांना गट नं. २१२ पैकी ०.४०आर. जमिन दिलेबाबत खरेदी खतात उल्लेख नाही. हे मला सांगता येणार नाही की, तथाकथित तारण जमिन किती रकमेकरिता दिली याचा उल्लेख माझे शपथपत्रात का केला नाही. हे मला सांगता येणार नाही की, माझे पुराव्याच्या शपथपत्रामध्ये तथाकथित ०.४०आर. मिळकतीच्या चतुःसिमा का नमुद केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र जगताप यांना दिलेल्या ०.४० मिळकतीचे ७/१२ उतारेस त्यांचे नावाची नोंद झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, राजेंद्र जगताप यांचे बरोबर खरेदी व्यवहार केला त्यावेळी प्रस्तुत दावा न्यायालयात प्रलंबित होता. मी गट नं. २१२ मध्ये ०.४० आर जमिन विक्री करण्यापूर्वी परवानगी कामी न्यायालयाकडे अर्ज केलेला नव्हता. मला माझे वतीने राजेंद्र जगताप यांना साक्षीदार म्हणुन तपासायचे आहे.

वि. दि. दावा क्र. ०१-२०२३
निशाण क्र. ४०३ ची पुरवणी

प्रश्न – तुम्ही राजेंद्र जगताप यांचे कडुन जमिन परत कधी घेतली त्याची तारीख, महिना व वर्षे काय आहे हे सांगता येईल का?

उत्तर – मला तारीख महिना सांगता येणार नाही, सन २०१२ मध्ये परत घेतली.

प्रश्न – तुम्ही तुमच्या पुराव्याच्या शपथपत्रात ती मिळकत राजेंद्र जगताप यांचेकडून किती रकमेस परत खरेदी केली याचा उल्लेख का केला नाही.

उत्तर – त्याचे व माझे आपसी ठरले होते.

हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याच्या शपथपत्रातील मजकुर दि. २५–०५–२०१२ रोजी राजेंद्र जगताप यांचेकडून गट नं. २१२ पैकी ०.४०आर. क्षेत्राची दस्त क्रमांक १८६१/२०१२ अन्वये खरेदी खत पलटून घेतले हे खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २५–०५–२०१२ रोजी खरेदी खत पलटून दिलेचे खोटी तारीख दर्शिविलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाची परवानगी न घेता राजेंद्र जगताप यांचे सोबत झालेले व्यवहार मुलतः बेकायदेशिर असल्यामुळे ते वादींवरती बंधनकारक नाहीत. राजेंद्र यांचेकडून मी खरेदी केलेल्या क्षेत्राचा महसुल दप्तरी अंमल झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी राजेंद्र यांचेकडून खरेदी केलेल्या क्षेत्राची महसुल दप्तरी नोंद धरलेचे खोटे व बनावट कथन शपथपत्रात केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये अधिकची गुंतागुंत निर्माण होवून वादीस साठेखतावरुन खरेदी खत होवून मिळू नये म्हणुन खोटा दस्त केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या पुराव्याच्या शपथपत्रातील कथनांची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे खोटे सरपासणी प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असून आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

(एस.एम.घुगे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

दि. ०४–०७–२०२५